Research Directions
Volume 1 , Issue 1 / July 2013 ISSN:-2321-5488

Research Article

# ''सातारा शहरातील ऐतिहासिक वास्तू''

**PRIYA TAMBE**

*सारांश*

सातारा जिल्ह्याला एक वैभवशाली इतिहासाचा वारसा आहे. भौगोलिक दृष्ट्या पुणे–बेंगलोर महामार्गावर पुण्यापासून 120 कि.मी. अंतरावर असणारे महत्त्वाचे ठिकाण आहे. सातारा शहर सह्याद्री पूर्व उतारावरील डोंगराळ भागात वसलेले आहे.

*'सातारा' या नाची व्युत्पत्ती :–*

सतारा या संज्ञेचे अनेक अर्थ आणि व्युत्पत्ती सांगण्यात येतात. सात दरा, महा दरा, सप्त तारा या शब्दांपासून सातारा शब्दाची व्युत्पत्ती झाली. पुर्वी सातारा या नावानेच प्रचलित असलेल्या अजिंक्यतारा किल्ल्यावरील सप्तऋषींच्या देवालयामुळे या किल्ल्यास सातारा नाव पडले. सातारा याचा अर्थ ईशान्य दिशा असाही होतो. तसेच किल्ल्यास असलेल्या सतरा दरवाजांवरुन सतराचा अपभ्रंश होऊन सातारा शब्द रुढ झाला असावा. कन्नडमधील सप्त म्हणजे विपुल व सातारा म्हणजे विस्तार असा एक अर्थ आहे.

सतारा हा प्रदेश 17 व्या शतकात छ. शिवाजी महाराजांच्या स्वराज्याचा एक भाग होता. शिवाजी महाराजांचे नातू छत्रपती शाहू पहिले यांनी 1708 साली सातारा येथे आपली राजधानी स्थापन केली होती. त्यांच्या काळात साताऱ्याला शाही राजधानीचे महत्व आणि भव्यता प्राप्त झाले होते. अशा पध्दतीने 'सातारा' या नावाची व्युत्पत्ती सांगता येईल.

*सातारा शहरातील ऐतिहासिक वास्तू :–*

*1) ग्रामदैवत व खिंडीतील गणपती –*

सातारा शहराचे ग्रामदैवत ढोल्या गणपती आहे. हे मंदिर नैऋत्य दिशेला आहे. जवळच समर्थ मंदिर असून येथे नवग्रहाचे मंदिर आहे. तेथून डाव्या हाताला कुरणेश्वर हे गणपतीचे प्रसिध्द मंदिर आहे. त्याला खिंडीतील गणपती असेही म्हणतात. हे मंदिर पहिले बाजीराव पेशवे यांचे मेहुणे कृष्णजी चासकर यांनी 1723 मध्ये बांधल्याचे सांगितले जाते. खिंडीतील गणपतीला जात असताना रस्त्यात लागणारा बोगदा 1855 साली कॅ. पी. हिल यांच्या मार्गदर्शनाखाली बांधल्याचा उल्लेख आहे.

*2) चार भिंती –*

साताऱ्यात पोवई नाक्यापासून जवळच हे ठिकाण आहे. टेकडीच्या माथ्यावर 30 फूट उंच चौकोनी स्तंभ, 12 फूट उंच भिंत व त्या भोवती तटबंदी आहे. त्यामध्ये झाशीच्या राणीचा पुतळा बसविण्यात आला आहे. उजव्या बाजूला रंगो बापू यांचा पूतळा बसविण्यात आला आहे. भारतीय स्वातंत्र्यवीरांच्या 1857 च्या स्वातंत्र्य युध्दाचा विजयस्तंभ उभा केलेला आहे. नगरपालिकेने काही ऐतिहासिक माहिती लिहिलेली आहे. पूर्वी येथे एक इमारत बांधली होती. राजघराण्यातील स्त्रिया दसऱ्याची मिरवणूक येथे बसून पाहात असे. तसेच पूर्वी ही टेहळणीची जागा असावी. हे चार भिंतीचे ठिकाण प्रतापसिंह महाराजांनी बांधले. ही इमारत पूर्वी चांगल्या स्थितीत होती. परंतु सन 1857 च्या उठावात ब्रिटीशांनी तोफा डागून ही इमारत नष्ट करण्याचा प्रयत्न केला. सन 1857 च्या इंग्रजांविरुध्द उठावाच्या शताब्दिनिमित्त 1957 मध्ये या ठिकाणी स्मारक स्तंभ उभारण्यात आला आहे.

*3) अदालत वाडा –*

किल्ल्याच्या पायथ्याशी बोगद्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर शाहू महाराजांच्या कालावधीपासून अस्तित्वात असलेल्या या वास्तूचा शाहू महाराज न्यायालयासाठी उपयोग करीत असे. पेशवे काळात तिचा खाजगी वापरासाठी उपयोग केला गेला. ही माठ्या दगडात बांधलेली इमारत 67.5 मी. लांब व 48 मी. रुंद आहे. इ. स. 1876 पर्यंत या इमारतीचा दिवाणी न्यायालय म्हणून उपयोग होत असे. आज अदालत वाडा सातारा राजकुळाचे वैभव आहे.

*4) डफळेंचा वाडा –*

सचिवांच्या वाड्याच्या पालीकडे सुमारे 120 मीटरवर जतचे जहागिरदार डफळे यांचा वाडा आहे. हा वाडा आकाराने सचिवांच्या वाड्याएवढा असून त्याला उत्तरेस लागून फळझाडे व मांडांची बाग आहे. या वास्तुच्या सुमारे 75 मी. उत्तरेच नातूंचा वाडा आहे. या नातूंचे एक पूर्वज शहाजी राजांचे अनुयायी होते. या वास्तूचा वापर सुरुवातीस पेशव्यांच्या सातारा मुक्कामासाठी होत असे.

*5) पंत प्रतिनिधींचा वाडा –*

ही वास्तू पंताचा काट या भागात आहे. तिला दक्षिणेला लागून मोठी पागा आहे. ही वास्तू सुमारे 60 X 60 मी. असून सध्या अस्तित्वात असलेली इमारत दौलतखान याने बांधली होती.

*6) तख्ताचा वाडा व रंगमहाल –*

आता येथे शाहू उद्यान आहे. तेथे थेरल्या शाहूंचा वाडा होता. तेथे त्यांचे सिंहासन होते म्हणून त्यास तख्ताचा वाडा म्हणत. जवळच असलेल्या विहीरीस तख्ताची विहिर म्हणतात.

रंगमहाल ही वास्तु अदालतवाड्याच्या पूर्वेस सुमारे 200 मी. अंतरावर आहे. मूळ इमारत 30 मी. लांब व 15 मी. रुंद असून तिला 45 मी. रुंदीची नवीन इमारत जोडून बांधली आहे. मूळ इमारत तीन मजली होती. शाहूच्या राण्यांचा राणीवसा येथे होता म्हणून या इमारतीस रंगमहाल असे नाव देण्यात आहे. सन 1847 मध्ये वास्तूस लागलेल्या आगीत ती भस्मसात झाली होती. ती नंतर दुरुस्त करण्यात आली. थोरल्या शाहूचा या वाड्यातच मृत्यू झाला. सध्या या इमारतीचा अर्धा भाग कूपर कारखान्याच्या ताब्यात आहे. इमारतीसामोर सेनापतीचा वाडा होता.

रंगमहालाच्या उत्तरेस दोन शाखा असलेली आयताकृती इमारत आहे. त्यातील एका इमारतीचा वापर राजांचे हत्ती बांधण्यासाठी पीलखाना म्हणून होई. रंगमहालाच्या उत्तरेस मामलेदार कचेरी होती. तिचा पूर्वेचा भाग शिर्क्यांच्या मालकीचा होता. 1857 च्या उठावात शिर्क्यांवर आरोप ठेवून ती इमारत सरकारजमा करण्यात आली.

*7) जुना राजवाडा –*

प्रतापसिंह महाराजांनी हा वाडा 1824 मध्ये बांधला. त्यावेळी कूलस्वामीनी भवानीदेवी या वाड्यात होती. मोठा हत्ती जाईल एवढा मोठा दरवाजा वाड्यास आहे. या वाड्याच्या पहिल्या मजल्यावरील सभागृहाच्या भिंतीवर भित्तिचित्रे असून ती भित्तिस्तंभ, खिडक्या व प्रवेशद्वार यांची स्थाने लक्षात घेऊन चितारली आहेत. खिडकीभोवती शोभिवंत नक्षीकामातील फुले, पर्णसंभार, वेली व फुलदाण्यांमुळे उच्च प्रकारच्या गालिच्यावर नाजूक कलाकुसरीची कल्पना येते.

*8) नवीन राजवाडा –*

हा वाडा प्रतापसिंह महाराजानंतर गादीवर बसलेल्या अप्पासाहेबांनी 1844 मध्ये बांधला. राजवाड्याच्या पुढील मंडपाची लांबी 25 मी. , रुंदी 12.5 मी. व उंची 7.5 मी. आहे. सन 1876 मध्ये ब्रिटिश शासकीय कार्यालये आहेत. सुमारे 65 वर्षापूर्वी सयाजीराव गायकवाड येथे आले असता त्यांचा मान–सन्मान ह्या वाड्यात करण्यात आला. त्यावेळी वाड्याच्या दोन्ही बाजूंनी दोन सुंदर कारंजे बांधण्यात आले. नवीन राजवाड्याच्या मागच्या सभागृहातील डाव्या बाजूस रामायण व महाभारत महाकाव्ये आणि पुराणातील कथानकांवर आधारलेली भित्तिचित्रे रेखाटली आहेत. छतामधील लाकडी वासा यामुळे अकरा खण निर्माण झाले असल्याने सभागृहास खणी सभागृह म्हणतात. सभागृहात मध्यभागी असलेल्या लाकडी कोरीव नक्षिकामाचा स्तंभ उभारुन उच्च दर्जाचे लाकडी कोरीव कामही केलेले आहे. त्यावरुन हा वाडा शाहूच्या रंगमहालापेक्षा सुंदर करण्याचा मानस अप्पासाहेबांचा होता. सभागृहाच्या दक्षिण बाजूस असलेल्या भिंतीत खिडक्या व प्रवेशद्वार बांधून या भित्तिचित्रांवर प्रकाशाची योजना केली आहे. तेथून वायूविजनही होते. या भित्तिचित्रांमधील मांडणी व रेखाटन पूर्ण मराठी शैलीतील आहेत. येथील रंगसंगती, चित्रआकृती वाई मेणवलीच्या रंगाप्रमाणे केलेली आढळते.

*9) जलमंदिर –*

शुक्रवार पेठेत आता जेथे नगरपरिषदेचे कार्यालय आहे. त्या इमारतीस पूवी गोल बंगला अथवा जलमंदिर असे म्हणत. या ठिकणी भवानी देवीचे मंदिर आहे. छत्रपतींचे खाजगी दैवत या मंदिरात आहे. 23 जुलै 1952 रोजी जलमंदिरातील 435 भार वजनाच्या सोन्याच्या मूर्ती चोरीस गेल्या. नंतर सुमित्राराजे यांनी चांदीच्या मूर्ती करुन त्यांची मंदिरात स्थपना केली.

*10) फाशीचा वड –*

शाहूपुरी रोडला जकात नाक्याच्या डाव्या बाजूने गेल्यावर आपण स्मृतिस्तंभापाशी जातो. स्वातंत्र्यलढ्यातील घटनांचा साक्षीदार असणाऱ्या दोन स्मारकांपैकी एक चारभिंती व दुसरे फाशीचा वड. 8 सप्टेंबर 1857 च्या लढ्यात 27 जणांनी हौतात्म्य पत्करले. त्यातील काही जणांना तोफेच्या तोंडी, तर काहींना गोळ्या घलून ठार मारण्यात आले. त्यावेळी त्यातील पाच जणांना येथे फाशी देण्यात आले. त्यात सीताराम गुप्ते, विठ्ठल वाकनीस, केशव चित्रे, नारायण पावस्कर आणि शिवराम कुलकर्णी यांचा समावेश आहे. तो जुना फाशीचा वड कोसळल्यानंतर तेथ नवीन वड लावण्यात आला व एक स्तंभ येथे बांधण्यात आला आहे. तसेच तेथून पुढे पेढ्याचा भैरोबा हे ठिकाण असून सध्या तेथे जाण्यास पायऱ्याही करण्यात आल्या आहेत.

*11) कृष्णेश्वर मंदिर –*

हे प्रसिध्द देवालय पहिल्या बाजीराव पेशव्याचा मामा कृष्णाजी चासकर याने तो साताराचा मामलेदार असताना शहराच्या पश्चिम टोकास यवतेश्वराच्या पायथ्याशी शके 1645 मध्ये बांधले. तेव्हा या भागास सदाशिवपुरा असे नाव होते. हे मंदिर बांधल्यावर पाच वर्षांनी व्यंकटराव घोरपडे या भागात वाडा बांधून राहू लागले. तेव्हापासून या भागाला व्यंकटपूरा असे नाव प्राप्त झाले आहे. या देवालयाच गाभाऱ्याच्या बाहेरील बाजूस दगडी स्तंभावर शिलालेख आढळतो.

*12) विश्वेश्वर मंदिर –*

मंगळवार पेठेतील या मंदिराची स्थापना शके 1758 मध्ये पावसचे रामचंद्र गंगाधर जोशी याने केली आहे. पावसहून साताऱ्याला कायमचे राहावयास आल्यावर आपले दैवत येथे आणले म्हणून जोशींनी हे मंदिर बांधले.

*13) खतिबा मशीद –*

औरंगजेबाची मुलगी झेबुन्निसा हिने थोरल्या शाहूचा चांगला सांभाळ करुन त्यांचे धर्मांतर होऊ दिले नाही म्हणून तिच्या स्मरणार्थ शाहूने मोहरमध्ये डोला सुरु करुन ही मशीद बांधली. हा डोला राजघराण्याने अजूनही चालू ठेवला आहे. राजघराण्याचा ताबूत अजूनही अग्रभागी असतो.

*14) शाही मशीद –*

दुर्गा पेठेतील ही मशीद उत्तम नक्षिकाम केलेली असून ती प्रतापसिंह महाराजांनी कलावंतीण अमिना हिच्या सुचनेनुसार बांधली. या संपूर्ण घडीव दगडांच्या मशिदीच्या बांधकामास सुमारे एक लाख रुपये खर्च आला होता.

*15) नटराज मंदिर –*

सातारा शाहराच्या पूर्वेला पंढरपूर मार्गावर आहे. हे मंदिर शामराव शानभाग यांनी स्वखर्चातून उभारलेले आहे. मंदिरातील मुख्य

प्रतिष्ठापना सोहळा हा 9 जून 1985 रोजी कांची कामकोटी पीठाधिपती श्री जयेंद्र सरस्वती यांचे हस्ते पार पडला. मंदिरात नटराजाची साडे चार फूट उंचीची पंचधातुची मूर्ती बसविण्यात आली आहे. या मंदिराभोवती गणपती, नवग्रह, राधाकृष्ण व इतर देवांची मंदिरे आहेत.

### *16) साताऱ्यातील इतर स्थळे –*

या ठिकाणांबरोबरच ऐतिहासिक वारसा सांगणाऱ्या साताऱ्यापासून इतर गावांचे अंतर जिथून मोजले जाते तो ब्रिटीशांनी बसविलेला पोवईनाका, पोस्ट ऑफीस चौकातील झिरो मार्शल स्टोन हा मैलाचा दगड साताऱ्याची सुरुवात सांगून जातो.

तीनशे वर्षापूर्वीचा वारसा सांगणारे गोल मारुती मंदिर, त्यानंतर ब्रिटीश काळातील वारसा सांगणाऱ्या 1865 ते 1873 या काळात साताऱ्याचे कलेक्टर जे. आर. आर्थर या ब्रिटिश अधिकाऱ्याच्या स्मृतिप्रीत्यर्थ एस.जे. आर्थर या त्याच्या मुलाने साताऱ्यातील जलछत्र छत्री व गोल बागेतील छत्री बांधलेली आहे. तेथे थोरले प्रतापसिंह महाराजांचा पुतळा बसविण्यात आला आहे. 1955 साली कॅ. पी. हिल याच्या मार्गदर्शनाखाली बांधलेला बोगदा तसेच झेड. पी. रोडवरील ग्रँट डफ यांचा बंगला, अवर लेडी ऑफ हेल्थ चर्च, सेंट थॉमस चर्च सदरबझार, सेंट मेरी चर्च निर्मल कॉन्व्हेंट स्कूल, आनंदवाडी दत्तमंदिरासमोरील बंदिस्त जागेत असलेल्या व एम.आय.डी.सी. हॉटेल कल्याण रिसोर्टच्या पाठीमागे जुन्या ब्रिटिश लोकांच्या समाध्या आहेत. ही ठिकाणे इंग्रज राजवटीची साक्ष देतात.

या ठिकाणाबरोबरच कोटेश्वर मंदिर, समर्थ नवग्रह मंदिर, समर्थ सदन, शाहू उद्यान, महानुभाव मठ, गारेचा गणपती, फुटके तळे व गणेश मंदिर, पंचमुखी गणपती, पंचपाळी हौद, महारदरे तळे, मंगळवार तळे, 17 कमानी असलेला हौद, खारी विहीर, गणकेश्वर मंदिर, माटे राम मंदिर इ. ऐतिहासिक वारसा सांगणाऱ्या गोष्टी आहेत.

### *समारोप :–*

उपलब्ध पुराव्या आधारे असे म्हणता येईल की, सातारा शहराला ऐतिहासिकदृष्ट्याा मराठ्यांच्या राजधानीचे वैभव शाहू महाराजांमुळे प्राप्त झाले. या शहराला मराठेकालीन राजघराण्याची परंपरा आज ही आहे. त्यामुळे सातारा शहरातील वास्तूंचे जतन करणे सर्वांची जाबाबदारी आहे. त्या दृष्टीने ऐतिहासिक वास्तूचा सखोल अभ्यास होण्याची गरज आहे.

### *संदर्भ :–*


1. सातारा जिल्हा गॅझेटिअर, 1885.
2. सातारा जिल्हा गॅझेटिअर, 1963.
3. सातारा जिल्हा गॅझेटिअर, 1999.
4. सरदेसाई गो. स. : मराठी रियासत, खंड 1, मुंबई 1988.
5. सरदेसाई गो. स. : मराठी रियासत, खंड 2, मुंबई 1989.
6. सरदेसाई गो. स. : मराठी रियासत, खंड 6, मुंबई.
7. आमचा सातारा : सातारा शहर नगरपालिका, 1967.
8. भावे वा. कृ. : पेशवेकालीन महाराष्ट्र.
9. कुंभार व्ही. एन. : राजधानी सातारा.
10. ग्रँट डफ : मराठ्यांचा इतिहास, खंड 3.
11. पारसनीस डी. बी. : सातारा.
12. चिटणीस : थोरले शाहू महाराज याचे चरित्र.
13. साने आर. बी. : थोरले शाहू महाराज
14. वाड जी. एस्. : (रुपा) सातारा राजांची आणि पेशव्यांची रोजनिशी.
15. रानडे एम्. जी. : संकीर्ण लिखाण.